# माध्यमातील रोजगाराच्या संधी बातमी लेखन व छायाचित्रण

कार्यशाळा अहवाल

दिनांक: 5 मार्च 2020

आयोजक : ताराबाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्र व
आजीवन शिक्षण आणि विस्तार सेवा विभाग
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

मुख्य मार्गदर्शक :1. मा. विजय बहादुरे
पत्रकार, दैनिक पुण्यनगरी, औरंगाबाद

2. मा. संजय शिंदे
जनसंपर्क अधिकारी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद

3. दत्ता कानवटे
दैनिक दिव्य मराठी, औरंगाबाद

कार्यशाळा समन्वयक : डॉ. निर्मला जाधव
संचालक, ताराबाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्र, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

अहवाल लेखन : डॉ. सविता बहिरट
संशोधन सहाय्यक, ताराबाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्र डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद

# माध्यमातील रोजगाराच्या संधी बातमी लेखन व छायाचित्रण

<u>कार्यशाळा अहवाल</u>






तारावाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्र डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्‌यापीठ व आजीवन शिक्षण आणि विस्तार सेवा विभाग डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्‌यापीठ यांच्या संयुक्त विद्‌यमाने विस्तार केंद्र उपक्रमांतर्गत माध्यमातील रोजगाराच्या संधी बातमी लेखन व छायाचित्रण या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन दिनांक 5 मार्च 2020 रोजी ताराबाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्राच्या फातिमा शेख सभागृहात करण्यात आले. प्रस्तुत कार्यशाळेसाठी मा. विजय बहादुरे, पत्रकार, दैनिक पुण्यनगरी, औरंगाबाद तसेच मा. संजय शिंदे, जनसंपर्क अधिकारी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्‌यापीठ, औरंगाबाद आणि दत्ता कानवडे, पत्रकार, दैनिक दिव्य मराठी, औरंगाबाद यांना आमंत्रित करण्यात आले प्रस्तुत कार्यशाळेचे समन्वयन डॉ. निर्मला जाधव यांनी केले.

प्रस्तुत कार्यशाळेचे प्रास्ताविक डॉ. निर्मला जाधव यांनी केले याप्रसंगी त्यांनी स्पष्ट केले की बातमी लेखन ही एक कला आहे. आपले ज्ञान हे केवळ एका विषयावर त्याच असू नये तर आपण चौफेर दृष्टिकोनातून अभ्यास करायला हवा असे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले. सायन्सचा विद्‌यार्थी जरी असला तरीदेखील त्याला सामाजिक शास्त्रातील मूलभूत स्वरूपाची माहिती असलीच पाहिजे किंवा

सामाजिक शास्त्रातील जरी विद्यार्थी असला तरी त्याला विज्ञानातील माहिती ही असलीच पाहिजे. माहिती तंत्रज्ञानाच्या युगामध्ये वावरत असताना आपल्याला ज्ञानाच्या कक्षा रुंद  कराव्या लागतील अन्यथा स्पर्धेच्या युगात आपण निश्चितपणे कुठेतरी मागे पडू  आणि म्हणून आपल्याला एका ठराविक चौकटीत न राहता वेगवेगळ्या मार्गांनी आपल्या ज्ञानात वृद्धी करणे महत्त्वाचे ठरते आणि म्हणून एका नवीन विषयाला धरून ताराबाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्राने माध्यमातील रोजगाराच्या संधी बातमी लेखन व छायाचित्रण या विषयावरील कार्यशाळेचे आयोजन केले. संबंधित विषयावरील कार्यशाळा उपस्थित विद्यार्थ्यांना निश्चितच लाभदायक ठरेल अशा पद्धतीची भूमिका डॉ.निर्मला जाधव यांनी व्यक्त केली.




प्रास्ताविक करतांना डॉ. निर्मला जाधव

माध्यमातील रोजगार संधी बातमी लेखन व छायाचित्रण या कार्यशाळेत सर्वप्रथम माननीय संजय शिंदे यांनी माध्यमातील बातमी लेखन या विषयावर मार्गदर्शन केले.  खेळा ते कळा हा माध्यम क्रांतीतील इतिहास मांडून भविष्यातील संधींबाबत विस्तृत मार्गदर्शन त्यांनी केले त्याचबरोबर श्री अभ्यास विषय अभ्यासणारे युवक पत्रकारितेत आले तर सामाजिक जाणिवा प्रगल्भ होण्यास मदत होईल असे प्रतिपादन त्यांनी केले. या क्षेत्रामध्ये रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध आहेत परंतु त्यासंदर्भात चांगले कौशल्य असणारे विद्यार्थी आजही कमी आहेत पत्रकारितेचे शिक्षण घेतलं म्हणजे बातमी लिहिता येते असे काहीही नसते विषयाचा एखाद्या विषयाचा असे समजून ज्याला त्याच्यातील महत्त्वाचे मुद्दे नमूद करता येत

असतील तर बातमी लेखनाचा तो एक महत्त्वाचा गुण असतो बातमी लेखनात उगीचच अनावश्यक माहिती असू नये त्याच बरोबर बातमीचे शीर्षक कधीही स्पष्ट समजेल असे व छोटी असावे आणि बातमीला उपशीर्षक देखील असते. त्यामुळे बातमी लेखनाची कला हे आपण विकसित करू शकतो त्याच प्रमाणे खाजगी आणि शासकीय अशा सर्वच ठिकाणी आज लेखन करणाऱ्या बातमी लेखन करणाऱ्या कौशल्यपूर्ण बातमी लेखन करणाऱ्या लोकांची गरज आहे आणि या क्षेत्रात चांगल्या पगारावर देखील नोकऱ्या उपलब्ध आहेत त्यामुळे बातमी लेखन किंवा तत्सम क्षेत्रांमध्ये आपण निश्चितपणे आपले भविष्य शोधू शकतो असे प्रतिपादन यावेळी त्यांनी केले.




बातमी लेखन या विषयावर मार्गदर्शन करताना मा. संजय शिंदे

प्रस्तुत कार्यशाळेत यानंतर दैनिक दिव्य मराठीचे पत्रकार दत्ता कानवडे यांनी इलेक्ट्रॉनिक माध्यमातील पत्रकारिता या विषयावर त्यांनी मार्गदर्शन केले.  संवेदनशील युवकांनी माध्यमात करियर करिअर घडवावे असे प्रतिपादन त्यांनी केले माध्यम क्षेत्र मोठ्या प्रमाणात विस्तार लसुन अभ्यासू व संवेदनशील युवकांना या क्षेत्रात मोठ्या संधी आहेत इलेक्ट्रॉनिक माध्यमातील पत्रकारिता या विषयावर त्यांनी मार्गदर्शन केले त्यांनी स्पष्ट केले की मुद्रित माध्यमांमध्ये गेल्या काही वर्षात झपाट्याने बदल होत आहे बातमी पेक्षाही विश्लेषणाला महत्त्व प्राप्त झाले आहे. इलेक्ट्रॉनिक माध्यमांच्या प्रसार नातून विषयाची गंभीरता विषयाचे महत्त्व अधिक चांगल्या प्रकारे समजण्यास मदत होते त्याचप्रमाणे मुद्रित साधनांत पेक्षा अधिक जलद जलदगतीने आपल्या आजूबाजूला घडणाऱ्या घटनांचा आपल्याला

इलेक्ट्रॉनिक माध्यमांच्या आधारे आढावा घेता येतो आपल्या हातात असणाऱ्या स्मार्टफोन च्या माध्यमातून आपण क्षणार्धात एकची माहिती तिकडे पोहोचवू शकतो त्याच प्रमाणे महत्त्वाच्या बातम्या देखील आपल्याला सहजपणे आत्ता या क्षणी सगळीकडे पाठवता येऊ शकतात त्यामुळे इलेक्ट्रॉनिक माध्यमे ही फार महत्त्वाची ठरतात परंतु यातील एक धोका सही असतो की कोणत्या बातमीला किती महत्व दिले पाहिजे हे देखील आपल्याला समजले पाहिजे बैलांची कोपर्डी हिंगणघाट यासारख्या घटना आपल्यासाठी काळीमा ठरले आहेत अशावेळी अभ्यासपूर्ण मांडणी व सोबतीला संवेदनशीलतेची जोड दिली तर खऱ्या अर्थाने सामाजिक परिवर्तन मध्ये महत्त्वाची भूमिका ठरेल असेही त्यांनी स्पष्ट केले.




इलेक्ट्रॉनिक माध्यमातील पत्रकारिता या विषयावर मार्गदर्शन करतांना मा. दत्ता कानवटे

प्रस्तुत कार्यशाळेत दैनिक पुण्यनगरीचे पत्रकार विजय बहादुरे यांनी बातमी लेखन आणि छायाचित्रण या विषयावर प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी स्पष्ट केले की बातमीमध्ये फोटो देत असताना बातमीमध्ये छायाचित्र देत असताना ते छायाचित्र संबंधित विषयात कितपत न्याय देते किंवा त्या बातमीची त्या छायाचित्राचा सहसंबंध आहे का हे सुरुवातीला पत्रकाराला कळाले पाहिजे हे सुरुवातीला आपल्याला कळाले पाहिजे त्याचबरोबर बातमीच्या अनुषंगाने दिलेले छायाचित्र व त्या खाली दिलेली माहिती हीदेखील सुसंगत असली पाहिजे छायाचित्र घेत असताना जवळून छायाचित्र नेमके कसे

घ्यावे या संदर्भातही आपल्याला ज्ञान असणे गरजेचे असते. बातमी लिहिताना शीर्षक उपशीर्षक आणि मुख्य मथळा आणि शेवट अशा पद्धतीने बातमीचा बातमी लिहिता आली पाहिजे त्याच प्रमाणे देत असलेले छायाचित्र हे बातमीला सुसंगत देणे व त्याचबरोबर ते क्लोजप असावे की दुरून घेतलेले असावे हे सुद्धा तितकेच महत्त्वाचे ठरते याचेही ज्ञान असणे गरजेचे असते. त्यामुळे बातमी लेखन करत असताना कमीत कमी शब्दांमध्ये शीर्षक असावे त्यानंतर उपशीर्षक आपल्याला त्या माहितीच्या त्या बातमीच्या अनुषंगाने अधिक विस्तृत देता येईल आणि मग नंतर संबंधित विषयाच्या अनुषंगाने तारीख ठिकाण या गोष्टी महत्त्वाच्या असतात व नंतर मुख्य बातमी आपल्याला द्यावी लागते. बातमी कुणालाही लिहिता येऊ शकते केवळ या तांत्रिक गोष्टी समजून घेतल्या तर बातमीचा आराखडा एकदा समजून घेतला तर कुणीही प्रभावी बातमी मी तयार करू शकते असे प्रतिपादन यावेळी बहादुरे यांनी केले.







बातमी लेखन आणि छायाचित्रण या विषयावर मार्गदर्शन करतांना मा. विजय बहादूरे

कार्यशाळेचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन ताराबाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्राचे विद्यार्थी अविनाश नरवडे यांनी केले. सदरील कार्यशाळेत प्राध्यापक अश्विनी मोरे प्राध्यापक मंजुश्री लांडगे प्राध्यापक सोनाली स्वर्णमाला मस्के डॉक्टर सविता बहिरट यांची उपस्थिती होती. सदरील कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने विद्यार्थी सहभागी झाले होते.






सूत्रसंचालन करतांना अविनाश नरवाडे

मुक्तसंवाद सत्र

डॉ. निर्मला जाधव
संचालक